# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

**७४) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १४.११.२०२५**

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०७/११/२०२५ ते १३/११/२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१५/११/२०२५ ते १९/११/२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | १३ | दिनांक | १५ | १६ | १७ | १८ | १९ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३० | ३० | २९ | २९ | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | १३ | ११ | १० | ९ | १० |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ८० | ७९ | ७७ | ७८ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३८ | ३७ | ३६ | ३५ | ३५ |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ६ | ६ | ६ | ६ | ७ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. **पुढील तीन दिवस किमान तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी थंडीच्या अनुषगाने काळजी घ्यावी.** |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा.<br>**३) थंडीमध्ये पिकाना जमिनीतुन खताची मात्रा देवु नये कारण थंडीमध्ये मुळांची कार्यक्षमता कमी होते त्यामुळे सदरील खते पिकाना उपयोगी पडत नाही.**<br>**४) थंडीमध्ये आंतरमशागतीची कामे टाळावीत जेणे करुन जमिनीतील उष्णता टिकुन राहिल.** |
| संदेश | | **पुढील तीन दिवस किमान तापमानात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी थंडीच्या अनुषगाने काळजी घ्यावी.** |
| गहू | पेरणी | बागायती गव्हाची पेरणी नोव्हेबरच्या दुसऱ्या आठवड्यानतर पेरणी करु नये. उशीरा पेरणी केल्यास उत्पादना घट येते. |
| हरभरा | पेरणी | पेरणीची वेळ लाबल्यास किवा डिसेबरनंतर पेरणी केल्यास उत्पन्न फार कमी मिळते. |
| तूर | शेंगा भरण्याची अवस्था | शक्य असल्यास शेंगामध्ये दाणे भरण्याच्या अवस्थेत पिकास पाणी द्यावे किंवा २ टक्के पोटाशियम नायट्रेटची (२०० ग्राम पोटाशियम नायट्रेट १० लिटर पाण्यात) फवारणी करावी. |
| कपाशी | वेचणी | १५ ते २० दिवसांच्या अंतराने वेचणी सुरू ठेवावी. |
| ऊस | पेरणी | पूर्व हंगामी ऊस लागवड नोव्हेबर अखेरीस पुर्ण करावी. त्याकरीता विद्यापीठाने विकसित केलेल्या जातींची निवड करावी.<br>बेणे प्रक्रिया: लागवडीपूर्वी बेण्यास ३०० मिली मेलेथिऑन किंवा २६५ मिली डायमेथोयेट किंवा १०० ग्रॅम बावस्टीन १०० लिटर पाणी या द्रावणात १० मिनिटांसाठी बेणे प्रकिया करावी. त्यानंतर १० किलो ॲसिटोबॅक्टर किंवा 1 लिटर द्रवरूप ॲसिटोबॅक्टर + १.२५ किलो स्फुरद विरघळणारे जिवाणू + १०० लिटर पाण्यात बेणे ३० मिनीटे बुडवून ठेवावीत. |
| बटाटा | पेरणी | रब्बी हंगामासाठी बटाटा या पिकांच्या लागवडीकरीता कुफरी ज्योती, कुफरी लवकर, कुफरी सिंधुरी, कुफरी सूर्या, कुफरी पुखराज ई.जातींचा वापर करावा. |
| वाटाणा | पेरणी | रब्बी हंगामासाठी वाटाणा या पिकांच्या लागवडीकरीता बोनव्हिला, अरकेल, फुले प्रिया ई. वाणांचा वापर करावा. |
| टोमॅटो | | भाजीपाला पिकांवर रस शोषणाऱ्या किडींचा व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे.<br>टोमॅटोवर करपा व फळसड दिसून आल्यास जमिनीवर पडलेली रोगग्रस्त पाने, फळे गोळा करुन व्यवस्थित जाळून नष्ट करावीत. ती बांधावर अथवा प्लॉट शेजारी टाकू नये.<br>रोग नियंत्रणासाठी टेब्युकोनॅझोल १० मिली प्रति दहा लीटर पाण्यात मिसळून साध्या हात पंपाने फवारणी करावी. पुढील फवारणी गरजेनुसार १०-१५ दिवसाच्या अंतराने करावी. |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **फळ पिके** | | थंडी पासून बचाव करणेकरीता फळ पिकाना संध्याकाळच्या वेळी पाणी द्यावे. थंडी पासून बचाव करणेकरीता फळधारणा झालेल्या फळझाडाची फळे पॉलिथीन/ बारदाणे/ कागदी पिशव्यानी झाकून ठेवावीत. |
| **पशुसंवर्धन** | | गुरांना रात्रीच्या वेळेस गोठ्यात बांधावे आणि थंडीपासून बचाव करण्यासाठी गोठा स्वच्छ व कोरडा ठेवावा.<br>थंडी पासुन संरक्षण करण्यासाठी निरोगी ठेवण्यासाठी जनावरांच्या आहारात प्रथिने आणि खनिजे यांची मात्रा वाढवा.<br>थंडीमध्ये जनावरांची उर्जेची गरज भागविण्यासाठी नियमितपणे जनावरांना खनिज मिश्रण, मीठ व गव्हाचा भरडा, गूळ इत्यादीचे मिश्रण योग्य प्रमाणे द्यावे. |
| **कुक्कुटपालन** | | पक्ष्याच्या शेडमध्ये कृत्रिम प्रकाश देऊन उष्णता निर्माण करावी.<br>सकाळच्या वेळी जनावरे चरण्यास सोडु नये.<br>रात्रीच्या वेळी जनावरे उघड्यावर बाधु नये. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : १४.११.२०२५

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**